# स्नेहबंध

# SNEHABANDH

मराठी भाषिक मंडळ टोरोंटो, वार्तापत्र वर्ष ३५ क्र५
Marathi Bhashik Mandal, Toronto, Newsletter Vol. 35 #5

प्रिय मराठी बंधू भगिनींनो,

हां हां म्हाणता हे वर्ष संपले सुध्दा. या वर्षीच्या सगळया कार्यक्रमांना यशस्वी करण्यात ब-याच मंडळींचा हातभार लागला. आपणही मोठया संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची रंगत वाढवलीत. त्याबद्दल मी माझ्या व सर्व कार्यकारिणीतर्फे आपले आभार मानते.

.......सौ. सुवर्णा कुलकर्णी

## संस्मरणीय एकांकिका महोत्सव

नाटक पाहाणे, गप्पा मारणे, जेवणांत पुरणपोळी असणे हे मराठी माणसांच्या शौकांपैकी काही शौक आहेत. हयापैकी कुठलीही एक गोष्ट मराठी मनास आनंदी करण्यास पुरेशी असते. जर मग हया तिन्ही गोष्टी एकत्र आल्या तर तो आनंदाचा त्रिवेणी संगमच! असाच केशर–दूध–शर्करा योग जुळून आला जेव्हां 'मराठी भाषिक मंडळा'ने चार एकांकिका मिळून "एकांकिका महोत्सव" आयोजित केला.

३० सप्टेंबर २००६ रोजी, कॉम्रा पार्क सेकंडरी स्कूलच्या दिमाखदार ऑडिटोरियममध्ये न्यूजर्सीहून आलेल्या मराठी हौशी कलाकारांनी कुठल्याही नेपथ्याचे अवास्तव स्तोम न माजवता, दर्जेदार दिग्दर्शन, कुशल अभिनय करून व्यावसयिक कंपन्यांना मागे टाकतील अशा ताकदीने सादर केलेल्या एकांकिका टोरांटोच्या प्रेक्षकांना बऱ्याच काळापर्यंत आठवणीत राहातील.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठी भाषिक मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुवर्णा कुलकर्णी हयांनी न्यूजर्सीहून आलेल्या पाहुण्यांचे व प्रेक्षकांचे स्वागत केले. तदनंतर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी चारीही एकांकिकेच्या दिग्दर्शकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर श्री. विजय आणि विनिता रत्न पारखे यांनी प्रेक्षकांना कार्यक्रमाची संकल्पना दिली.

महोत्सवात सादर करण्यात आलेल्या चार एकांकिका अशा प्रकारे होत्याः

**'गांधी हत्याः खून की वध?'** लेखक – प्रदीप दळवी, दिग्दर्शन –सुचेता साठे

**'पत्रावली'** लेखक – सुधीर कवडी, दिग्दर्शन – मकरंद भावे

**'रिक्षावाला'** लेखक – चंद्रशेखर फणसाळकर, दिग्दर्शन –श्रीराम देवरे

**'पावसातला पाहुणा'** लेखक – रत्नाकर मतकरी, दिग्दर्शन – मनोज शहाणे

महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचा विषय असणाऱ्या आणि नथुराम गोडसेची भूमिका सडेतोडपणे स्पष्ट करणाऱ्या, वादग्रस्त ठरलेल्या हया एकांकिकेत, विशाल छेडाने आपल्या प्रभावशाली शब्दफेकीने, जीव ओतून 'पंडित'ची भूमिका अशी सादर केली की त्यांच्या वाक्यांना उत्स्फूर्त टाळया पडल्या, तर काही संवादांमुळे प्रेक्षक गहिंवरला! एकंदरीत नाटकचे सादरीकरण जबरदस्त झाले यात वादच नाही.

हयाच एकांकिकेत आपल्या मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. अविनाश कुलकर्णी यांनी पोलिस निरीक्षकाची भूमिका अत्यंत सहजपणे निभावून नेली.

यानंतर २००६ मध्ये न्यूजर्सीमध्ये आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेत अनेक बक्षिसे पटकवणारी 'पत्रावली' ही एकांकिका सादर करण्यात आली आणि सर्वांचे मन जिंकून गेली. सुधीर कवडी लिखित ही एकांकिका कांही चलाख मंडळी आपल्या समाजातील अंधश्रद्धेचा कसा फायदा करून घेतात हा अनुभव प्रेक्षकांना देते. श्री. मकरंद भावे यांनी शाळकरी विद्यार्थ्यापासून, नवरा ते अगदी म्हातारा माणूस आणि श्रीमती अनुजा जोशी यांनी शाळामास्तरीणीपासून, नटी ते आजी अशा अत्यंत विविध आव्हांनपूर्ण भूमिका समर्थपणे केल्या. कुमार वयापासून ते म्हाताऱ्यांच्या भूमिका हाताळण्याचे त्यांचे कौशल्य निःसंशय वाखाणण्यासारखे होते.

लग्नापूर्वी एकमेकासांठी कुठलीही तडजोड करण्यास तयार असणारा पति लग्नानंतर बायकोला आपल्या मालकीची वस्तु मानू लागतो? नवऱ्याचा अहंकार किती टोकाला जाऊ शकतो अशी मनोविश्लेषणावर आधारित 'रिक्षावाला' ही एकांकिका श्री. श्रीराम देवरे हयांनी उत्कृष्टपणे सादर केली.

शेवटची एकांकिका 'पावसातला पाहुणा' ही रत्नाकर मतकरींच्या गूढकथेवर आधारीत असून त्याचे सादरीकरण, लिखाण, संवाद व संगीत – सर्व काही गूढमय वातावरणास पोषकच होते. 'माय मराठी' फेम डॉ. मनोज शहाण्यांनी हे रूपांतर, दिग्दर्शन करून मुख्य पात्राची भूमिका केली. एकांकिकेत नाट्यातील गूढता टिकवून शेवटच्या क्षणी अनपेक्षित कलाटणी देण्याचे कसब दिसून आले. कौतुकास्पद बाब म्हणजे मराठी न जाणणाऱ्या शिवानी भागवतने वठविलेली पत्नीची भूमिका.

महोत्सवातील विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे मंडळाने 'गांधी हत्याः खून की वध?' हया एकांकिकेसाठी जे मानधन श्री. विशाल छेडांना दिले होते, त्यांतील फक्त एक डॉलर ठेवून बाकीचे सर्व पैसे त्यांनी टोरांटोच्या मंडळाला भेट म्हणून परत दिले.

मध्यंतरात उपाहारासाठी 'आनंद बाजार' आयोजित केला होता. तेव्हां सुमारे साडेतीनशे उपस्थित प्रेक्षकांनी पुरणपोळी, वडा–पाव, भेळ, मिसळ अशा विभिन्न खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला.

हया महोत्सवासाठी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विविध स्तरांवर कामे केली व कार्यक्रम यशस्वी करण्यास मदत केली. श्री. विजय रत्नपारखे आणि सौ. विनिता रत्नपारखे हया दांपत्याचा उल्लेख विशेषेकरून करायला हवा. सुमारे दोन महिन्यांपासून त्यांनी हया एकांकिकेच्या सर्व निर्मात्यांशी संपर्क साधण्यापासून, महोत्सवाची प्रसिध्दी देणे, स्मरणिका छापणे, जागा उपलब्ध करून देणे, पाहुण्यांची व्यवस्था करणे इत्यादी अनेक बाबींवर लक्ष ठेवून ""एकांकिका महोत्सव" अत्यंत व्यवस्थितपणे पार पाडण्यास सिंहाचा वाटा उचलला.

## संस्मरणीय एकाकिंका महोत्सव.................

गंधर्वकाळात पहाटेपर्यंत चालणारे संगीत नाटक केव्हांच कालबाह्य झाले आहे. आजकालच्या फास्ट जमान्यात तासाभराच्या एकांकिका त्यांच्या मर्यादित वेळेमुळे अडीच–तीन तासांच्या नाटकांना प्रतिस्पर्धी होऊ पाहाताहेत.

– शशिकांत शेटे

## कोजागिरी

अश्विन प्रतिपदेने सुरू झालेल्या रासगरब्यांना पूर्णविराम मिळतो तो कोजागिरी पौर्णिमेला दाडया खेळूनच. कोजागिरी पौर्णिमा म्हटली की मराठी माणसाला आठवण येते ती चंद्राच्या शीतल चांदण्याची व त्या चांदाण्यात बसून घेतल्या जाणा-या आटीव मसाला दुधाच्या आस्वादाची. आम्ही मुंबईकर मंडळी हे दूध पिऊन चांदण्या रात्रीची मजा लुटायला समुद्र किना-यावर फिरायला जात असू. मी गुजराती लोक ामध्ये राहिल्यामुळे मला कोजागिरीला गरबा खेळण्याची सवय होती. टोरांटोत आल्यावर इथे कोजागिरीची मजा कुठे येणार असे मला वाटले होते. पण मराठी मंडळाने त्यावरही उपाय काढला आहे. मराठी व गुजराती संस्कृतीचा सुरेख संगम साधून मंडळाने टोरांटोतसुद्धा कोजागिरीची मजा कायम राखली आहे, व सर्व आबालवृद्धांना, विशेषतः किशोरवयीन मुलामुलींना मराठी मंडाळाशी जोडून ठेवले आहे.

या वर्षीचा कार्यक्रम कोजागिरी देवीच्या आरतीने सुरू झाला. मेहबूब वाद्यवृंदाने वेगवेगळी जुनी नवी गाणी वाजवल्यामुळे खेळाला चांगलाच रंग चढला. मध्यंतरात सर्वांनी बटाटेवडे, शिरा व मसाला दुधाचा आस्वाद घेवून पुन्हा खेळायला सुरवात केली. कार्यक्रमाच्या शेवटी खास लोकाग्रहास्तव म्हणलेल्या हिंदी गाण्याच्या तालावर सर्व मुलामलींनी बॉलीवूड स्टाईल नाच केला. छोटयाशा मोनिषा दातेच्या नाचाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

स्वयंसेवकांच्या मदतीने सौ. सुवर्णा कुलकर्णी, सौ. सरीता कुकडे, श्री. विजय रत्नपारखे, श्री. अजित पोतनीस, श्री. सुहास कुमार यांनी केलेल्या श्रमांमुळे सर्वांनाच कोजागिरीची मजा लुटता आली.

....................................सौ. विदुला गोखले

## दिवाळी

“भाषा” ही संस्कृतिची सहचर आहे. भाषा टिकली तरच संस्कृति टिकेल. आपलं मराठी भाषिक मंडळ मराठी भाषा व संस्कृति, तिच्या सर्व वैशिष्टयासह टिकविण्याचा प्रयत्न गेल्या कित्येक वर्षापासून सातत्याने करत आहे.

त्याच अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहाने पार पडला. ठेवणीतल्या भरजरी साडया नेसून आलेला स्त्रीवर्ग, घागरा चोळी, परक र पोलक अशा वेषात नटलेल्या चिमुरडया मुली, आणि पारंपारिक भारतीय वेषात आलेली पुरुष मंडळी! सर्वांच्याच उत्साहाला उधाण आल होतं. नेहमीच्या भेटीगाठी, गप्पागोष्टी यांच्याबरोबरंच साडीविक्री, पुस्तक प्रदर्शन इत्यादि स्टॉलवर सभासदांनी गर्दी केली होती. विशेष जाणवला तो मराठी शाळेचा स्तुत्य उपक्रम.

## दिवाळी.......................

छोटुकल्या मुलांनी दिवाळीनिमित्त केलेल्या सुबक पणत्या, दिवे, व विविध डाळी व धान्ये वापरून केलेल्या सुंदर रांगोळया यांचे प्रदर्शन भरविले होते. अतिशय कल्पकतेने आपले सण व संस्कृति पुढच्या पिढीपर्यंत पोचवण्याचा मराठी शाळेचा हा प्रयत्न खरोखरच कौतुकास पात्र आहे. कार्यक्रमाचे संचालन मंडाळाच्या अध्यक्षा सौ. सुवर्णा कुलकर्णी यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

नेहामीप्रमाणे याही वर्षी मराठी युवा पारितोषिक आणि विक्रम पारितोषिक प्रदान करण्यात आली. या वर्षीचे मानकरी खालीलप्रमाणे.

१. बारावीत सगळयात जास्त गुण .

.....अनिषा खारकर

२. १२ वी मध्ये इंग्रजीत सगळयात जास्त गुण

. .. अनिषा खारकर (देशपांडे पुरस्कार)

३. अभ्यासाव्यतिरिक्त इतर क्षेत्रात विशेष नैपुण्य

.संगीत ......रवी दातार, साहित्य .....सई परांजपे

४. विक्रम पारितोषिक(विभागून)

. ..अंकिता तडकसे आणि रवी दातार

यावर्षीच्या दिवाळी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते केदार शिंदे लिखीत व वैभव कुलकर्णी दिग्दर्शित दोन अंकी धम्माल विनोदी नाटक “मनोमनी”. “काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छंति धीमताम” असे म्हटले आहेच. अगम्य, गूढ, अतर्क्य अशा या मानवी मनाची उकल करण्याचा प्रयत्न बहिणाबाई सारख्या प्रतिभावान कवयित्रीपासून “फ्रॉईड” सारख्या विख्यात मानसशास्त्रज्ञापर्यंत केला आहे. तरीही पूर्णपणे न उमगलेले, दशांगुळे उरलेले हे मन!

मनातील विचार, गैरसमज, उगीचच पाहिलेली स्वप्ने व त्यामुळे होणारा गोंधळ, विनोद व शेवटी सर्व संशयपटल दूर होऊन मंगलाष्टकाने होणारा गोड व धक्कादायक शेवट प्रेक्षकांना सुखावून गेला, मन तृप्त करून गेला. सर्वच कलाकारांचा अभिनय उत्कृष्ट होता व त्याला प्रेक्षकांची वरचेवर दाद मिळत होतीच.

नाटक यशस्वी करायचे म्हणजे अनेक अवधाने! दिग्दर्शन, प्रकाशयोजना, रंगभूषा, नेपथ्य, पडदयामागील कलाकार, इत्यादी, इत्यादी. पण नाटकाच्या संपूर्ण टीमने सर्व अवधानांचा सुयोग्य मेळ साधला. या सर्वाचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

मनाच्या तृप्तीनंतर प्रेक्षक वाट पहात होते सुग्रास भोजनाची. सौ. सरिता कुकडे व सौ. लीना भोळे यांनी यावर्षी अन्नपूर्णेची जबाबदारी यशस्वीरित्या पेलली. त्यांनी व सर्व स्वयंसेवकांनी अतिशय शिस्तीत व नियोजनपूर्वक स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पाडला.

दिवाळी हा प्रकाशाच्या उजेडाने अंधारावर मात केल्याने साजरा करावयाचा सण! परंतू आज शस्त्रास्त्रांच्या भीषण स्पर्धेमुळे, साम्राज्यवाद व दहशतवादाच्या बाधेमुळे आपला भविष्यकाळ अंधारमय होते की काय अशी भिति वाटत आहे. आपण आपल्या परीने सहिष्णुता, ज्ञान, व प्रेम या ज्योति प्रज्वलित करूया, व ज्योतीने ज्योत लावून सर्व जग प्रकाशमय करूया. **तमसो मा ज्यातिर्गमय !**

.......सौ. रचिता धर्मापुरीकर - देशपांडे